# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

क्र.संगाबाअवि/३/प-चौ/४००/२०१९.
दि.०८.०२.२०१९.

प्रति,

प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषयः- हिवाळी -२०१८ बी.ए.भाग -१ सत्र १ चे जाहिर करण्यात आलेल्या निकालाच्या गुणपत्रिकांबाबत..**

संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, हिवाळी -२०१८ बी.ए.भाग -१ सत्र १ चा निकाल दिनांक २३/०१/२०१९ रोजी जाहिर करण्यात आला आहे. जाहिर करण्यात आलेला निकाल, गुणपत्रिका व सारणी तक्ते प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या लॉगीनवर टाकण्यात आलेली आहेत. तांत्रिक अडचण निर्माण झाल्यामुळे निकालाच्या मुळगुणपत्रिका महाविद्यालयाला एक महिन्याच्या आंत पुरविण्यात येतिल. ज्या विद्यार्थ्यांचे गुणाअभावि निकाल रोखलेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे गुण संबधीत कर्मचा-यांकडे सादर करावेत जेणेकरून विद्यार्थ्यांना परीक्षा आवदेनपत्रे भरण्यास अडचण होणार नाही.

महाविद्यालय प्रशासनाला विनंती करण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांच्या ऑनलाईन प्रिन्ट काढाव्यात व परीक्षा शुल्काची मुळ रक्कम आकारून विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे दिनांक २५/०२/२०१९ पर्यंत स्वीकारून ती परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालयाच्या दर्शनी भागात लावलेल्या टेबलवर दिनांक २८/०२/२०१९ पर्यंत सादर करावे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ